ज्ञान नेहमीच आपल्यासाठी एक शक्तिशाली शस्त्र असते, त्यामुळे ते सतत वाढवत राहा.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार २२ मार्च २०२५ | अंक १०१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# कर्नाटकात मुस्लिमांना ४ टक्के आरक्षण!
## जोरदार गदारोळात विधानसभेत मंजूर झाले



### मुस्लीमांना आरक्षण

**गेल्या शुक्रवारी मंत्रीमंडळाने कर्नाटक सार्वजनिक खरेदीमध्ये पारदर्शकता (केटीपीपी) कायद्यात सुधारणांना मंजुरी दिली होती. ज्यामध्ये २ कोटी रुपयांपर्यंतच्या (सिव्हील काम) कामांच्या करारांमध्ये ४ टक्के आणि १ कोटी रुपयांपर्यंतच्या वस्तू/सेवा खरेदी करारांमध्ये मुस्लिमांसाठी राखीव ठेवण्यात आले. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी ७ मार्च रोजी सादर केलेल्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात मुस्लीमांना चार टक्के आरक्षणाची घोषणा केली होती.**

कर्नाटक विधानसभेत मुस्लीमांना सरकारी कंत्राटात मुस्लींना चार टक्के आरक्षण देणारे विधेयक जोरदार गदारोळात मंजूर झाले आहे. भाजपाने या विधेयकास विरोध करीत त्यास घटनाबाह्य म्हणत विधानसभेत घोषणाबाजी करीत गोंधळ घातला. भाजपाने काँग्रेसवर तुष्टीकरणाचा आरोप करीत या विधेयकाला आव्हान देण्याचा निर्णय घेतला आहे. तर काँग्रेसने यास सामाजिक न्यायाचे पाऊल म्हटले आहे. कर्नाटक विधानसभेत सरकारी कंत्राटात मुस्लीमांना चार टक्के आरक्षण देणारे वादग्रस्त विधेयक मंजूर झाले आहे. हनी ट्रॅपवरुन गोंधळ सुरु असतानाच हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे. भाजपाच्या आमदारांनी हनी ट्रॅप घोटाळ्यावर चर्चा करण्याऐवजी या विधेयकाला मंजूरी दिल्याने सत्तारुढ काँग्रेस पक्षावर जोरदार टीका केली आहे. प्रचंड गदारोळात विधेयकाला मंजूरी मुस्लीमांना सरकारी कंत्राटात चार टक्के आरक्षण देण्याच्या या विधेयकाला भाजपाने घटनाबाह्य म्हणत राज्यात घोटाळ्यांवर उत्तर देण्याऐवजी मुस्लींना कोटा विधेयक देऊन लांगुलचालन केल्याचा आरोप केला आहे. या विधेयकाला जशी मंजूरी मिळाली तशी भाजपाचे नेते नारेबाजी करीत विधानसभेत घुसले आणि स्पीकरच्या सीटवर चढून बसले. तसेच या विधेयकाच्या प्रती देखील फाडून टाकल्या. तसेच स्पीकरवर कागदाचे तुकडे फेकले.

### विधेयकाला आव्हान देणार - भाजपा

हनी ट्रॅप घोटाळ्यावर चर्चा घडवून आणण्या ऐवजी मुख्यमंत्र्यांनी मुस्लीमांना चार टक्के आरक्षणाचे विधेयक मांडण्यात व्यस्त होते. त्यामुळे आम्ही याचा विरोध केला आहे. सत्ताधारी आमदारांनी कागद फाडून आमच्यावर टाकले. पुस्तके आमच्यावर फेकली आहेत. आम्ही कोणाला नुकसान पोहचवले नाही. भाजपा या विधेयकाला कायदेशीर आव्हान देण्याची तयारी करीत आहे असे भाजपाचे आमदार भरत शेट्टी यांनी म्हटले आहे.

# सरपंच पतीचा केज पंचायत समितीत आत्मदहन करण्याचा प्रयत्न!

केज : घनकचरा व्यवस्थापन, सांडपाण्याचे शोषखड्डे व सार्वजनिक शौचालय बांधकाम या कामांची मोजमाप पुस्तिकेत नोंद घेऊन बिल काढण्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी महिला सरपंचाकडे ५० हजार रुपयेची मागणी केली. त्या पैकी त्यांना २० हजार रु. देऊनही ३० हजार रु. न दिल्यामुळे त्यांनी बिल काढले नसल्याने व्यथित होऊन संतप्त झालेल्या सरपंच पतीने केज पंचायत समितीमध्ये आत्मदहनाचा प्रयत्न केला. केज तालुक्यातील डोका येथील महिला सरपंच कमल गोरख भांगे यांनी गावांमध्ये घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी नियोजन यासाठी आणि सार्वजनिक शौचालय याची कामे केलेली आहेत. सर्व कामे पूर्ण होऊन देखील त्याची मोजमाप पुस्तिकेत नोंद घेऊन त्यांच्या बिलासाठी त्यांनी वारंवार ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकड े कागद पत्रांनिशी मागणी केली. परंतु ग्रामीण पाणीपुरवठा योजनेचे कार्यकारी अभियंता आंधळे, कनिष्ठ अभियंता चव्हाण आणि शाखा अभियंता वंदना साळवे या दोघांनी सरपंच पती गोरख भांगे यांच्याकडे ५० हजार रु. ची मागणी केली. गोरख भांगे यांनी कार्यकारी अभियंता आंधळे यांना त्यापैकी २० हजार रुपये त्यांना नगदी दिले. मात्र अद्यापही त्यांचे बिल निघाले नाही. त्या बाबत त्यांनी चौकशी केली असता उर्वरित ३० हजार रुपये जो पर्यंत देणार नाहीत; तोपर्यंत बिल मिळणार नाही. अशी अरेरावीची भाषा वापरली, तसेच खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली.त्यामुळे संतप्त झालेल्या सरपंच पती गोरख भांगे यांनी २० मार्च रोजी दुपारी ४:०० वाजण्याच्या सुमारास केज पंचायत समितीच्या इमारतीमध्ये आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.



# नगरपरिषद कर्मचाऱ्यांचे पगार रखडले!

बीड : महाराष्ट्रात आज जवळपास ३८८ नगरपरिषदा व नगरपंचायती आहेत, यामध्ये अंदाजे १.५ ते २ लाख अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. इतका मोठा राज्य शासकीय व निमशासकीय कर्मचारी वर्ग असून आजही फेब्र ुवारी महिन्याच्या वेतनाच्या प्रतीक्षेत आहे. याची ना नगरविकास विभागाला फिकीर पडली आहे ना नगरपरिषद प्रशासन संचालनालयाला देखील पडली नाही. जकातीद्वारे मिळणारा महसूल हा नगरपरिषदांचा आर्थिक कणा असल्याने त्या आर्थिकदृष्ट्र या सक्षम/स्वावलंबी होत्या, परंतु शासनाने जकात बंद के ली व त्याऐवजी वेतन व निवृत्तिवेतनासाठी सहायक अनुदान देणे सुरू केले. दर महिन्याला शासनाचा नगरविकास विभाग सहायक अनुदानाची ठोक रक्कम नगरपरिषद प्रशासन संचालनालयालय, व संचालनालयाकडू न राज्यातील सर्व नगरपरिषदांना सहायक अनुदानाचे वितरण होते. शासनाकडून सहायक अनुदान प्राप्त झाल्यावरच नगरपरिषदांच्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तिवेतन अदा केले जाते. गेल्या अनेक वर्षांपासून सहायक अनुदान शासनाकडू न वेळेवर मिळत नसल्यामुळे राज्यातील सर्व नगरपरिषदांचे वेतन दर महिन्याला उशिराने दिले जात आहे.


# आजही पुरावा आणून द्या, धनंजय मुंडेंवर कारवाई करतो : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : या हत्येत धनंजय मुंडे यांचा कोणताही थेट संबंध आढळलेला नाही. फक्त कोणीतरी दररोज टीव्हीवर येऊन आरोप केले म्हणून कोणाचं नाव चार्जशीटमध्ये घेता येत नाही. आजही पुरावा आणून दिल्यास धनंजय मु ंडे यांच्याविरोधात कारवाई केली जाईल, असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी सीआयडीने कोर्टात जी चार्जशीट सादर केली आहे त्यामध्ये धनंजय मुंडे यांचा थेट कुठेही संबंध आढळलेला नाही. पण तपास यंत्रणांनी वाल्मीक कराड याला या हत्या प्रकरणात मुख्य आरोपी केलं आहे. हा वाल्मीक कराड धनंजय मु ंडेंचा राईट हँड होता आणि गेल्या अनेक वर्षांपासून त्यांचं राजकारण सांभाळत होता. मंत्र्याच्या जवळचा व्यक्ती इतकं क्रूर कृत्य करत असेल तर तर त्या मंत्र्याने प्रायश्चित्त म्हणून आपलं पद सोडावं, अशी आमची भूमिका होती. त्यामुळे आम्ही धनंजय मु ंडे यांचा राजीनामा घेतला, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.



# महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण; आग्रा येथे होणार शिवाजी महाराजांचं भव्य स्मारक

आग्रा येथील छत्रपती शिवाजी म हाराजांच्या स्मारकाबाबत महाराष्ट्र शासनाकडून शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज आग्रा येथे असताना ज्या ठिकाणी नजरकैद होते, ती जागा महाराष्ट्र सरकार अधिग्रहित करणार आहे. आग्रा येथे शिवरायांची गाथा सांगणारं संग्रहालय देखील महाराष्ट्र सरकारकडून उभारलं जाणार आहे. यासाठी राज्य सरकारच्या पर्यटन विभागाकडून आर्थिक तरदूत करण्यात येणार आहे.



काय आहे शासन निर्णय? मराठा साम्राज्याने सतराव्या आणि आठराव्या शतकात भारताच्या विविध ठिकाणी आपले साम्राज्य निर्माण केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून रयतेचे राज्य निर्माण केले. हे राज्य निर्माण करण्यासाठी महाराजांना अनेक कष्टप्रद आव्हाने स्वीकारावी लागली. प्रसंगी काही ठिकाणी माघार सुद्धा घेऊन तह करण्यात आले.

# यापेक्षा आणखी काय दुर्दैव असावं
## आईजवळ मयत मुलीवर अंत्यसंस्कारासाठी पैसे नसावेत

बीड। प्रतिनिधी नऊ महिने पोटात सांभाळल्यानंतर सातव्या वर्षीचं एका आईने तिच्या मुलीला कायमचे गमावल्यानंतर मुलीच्या अंत्यसंस्कारासाठी देखील तिला हातबल व्हावे लागते. यापेक्षा मोठे दुर्दैव ते कोणते. बीड शहरातील या घटनेमुळे माणुस म्हणून घेणाऱ्या प्रत्येकाला वेदना झाल्याशिवाय राहणार नाहीत. पैसे नसल्यामुळे अंत्यसंस्कार मी करू शकत नाही असे एखाद्या आईला म्हणावे लागते हे २१ व्या शतकातील दुर्दैव म्हणावे लागेल. बीड शहरातील एक माता आपल्या अवघ्या सात वर्ष वयाच्या मुलीला घेवून जिल्हा रूग्णालयात धावत जाते. नऊ महिने पोटात सांभाळलेल्या लेकराला वाचविण्याचा प्रयत्न करते. परंतू डॉक्टर मात्र आता उपचार होणार नाहीत कारण उपचार सुरू करण्यापूर्वीच सदर सात वर्षीय मुलीचा मृत्यु झाल्याचे सांगतात. तेव्हा नऊ महिने पोटात सांभाळणाऱ्या आईला हतबल व्हावे लागते. दुखी मनाने या घटनेला नव्हे तर या प्रसंगाला सामोरे जावे लागते. परंतू दुख तिथेच थांबत नाही तर स्वतःच्या मयत मुलीच्या अंत्यसंस्कारासाठी आपल्याकडे पैसे नाहीत म्हणून त्या आपल्या मयत मुलीला जिल्हा रूग्णालयात सोडून जावे लागते हे माणुस म्हणून घेणाऱ्या कुठल्याही व्यक्तीच्या मनाला वेदना देणारे घटना आहे. बीड शहरातील जिल्हा रूग्णालयात शुक्रवारी सकाळी ९.३० वाजण्याच्या दरम्यान पुजा लोंढे या सात वर्षीय



बालिकेला तिची आई सोनाली लोंढे यांनी जिल्हा रूग्णालयामध्ये धावत येवून दाखल केले. आपल्या बाळाला काहीतरी झाले आहे, उपचार हवेत, ती जगली पाहीजे या हेतूने जिल्हा रूग्णालयात आलेली सोनाली लोंढे डॉक्टरांच्या त्या उत्तराने मात्र निरूत्तर झाली असेल कारण उपचार सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांनी तिच्या बाळाला मयत घोषीत केले होते. स्वतःच्या बाळाचा मृत्यु झाल्याचे दुःख कुठल्याही आईला होणार ते सोनाली लोंढेला देखील झाले असेल परंतू मृत्युनंतर अंत्यसंस्कार करण्याची जी वेळ असते त्यासाठी पैसे नाहीत म्हणून ती माता रूग्णालयातून निघून जाते. २१ व्या शतकामध्ये चंद्रावर कोण चाललंय, कोण चंद्रावरून आलंय, जगाने किती प्रगती केली, देशात प्रगतीचे, विकासाचे कोणते प्रकल्प सुरू आहेत या चर्चा सुरू असताना एखादी आई तिच्या मुलीवर अंत्यसंस्कारासाठी पैसे नाहीत म्हणून हतबल होत असेल तर यापेक्षा मोठे दुर्दैव कुठलीच असू शकत नाहीत. या घटनेमुळे माणुस म्हणून घेणाऱ्या प्रत्येकाच्या मनाला वेदना झाल्याशिवाय राहणार नाहीत असे असले तरी देखील समाजात चांगली माणसं आहेत हे विसरून चालणार नाही. आमची प्रतिनिधी अमजद खॉन यांना ही बाब समजल्यानंतर त्यांनी या चिमुकलीवर अंत्यसंस्कार करण्यासाठी किंवा मृत्युनंतर असलेली प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी पुढाकार घेवून काही गोष्टी करण्याचे ठरविले आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २२ मार्च २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### सुधारणांच्या दिशेने टाकलेले एक पाऊल

मतदार ओळखपत्र आणि आधार यांची जोडणी करण्याबाबत निवडणूक आयोगाने केलेले सूतोवाच, हे मतदान प्रक्रियेतील सुधारणांच्या दिशेने टाकलेले एक पाऊल म्हणावे लागेल; मात्र वेगवेगळ्या तांत्रिक, व्यावहारिक आणि घटनात्मक अडचणींमधून पार होऊन ते प्रत्यक्ष लागू करण्याचा पल्ला अतिशय दूरवरचा आहे. मतदान प्रक्रियेमध्ये अनेक त्रुटी असल्याचे प्रत्येक निवडणुकीनंतर समोर येते. देशभरात मतदार याद्यांमध्ये प्रचंड घोळ आहेत. महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांची संख्या आश्चर्यकारक पद्धतीने वाढल्याचा आरोप काँग्रेसने केला; तसेच पश्चिम बंगालमध्ये मतदार ओळखपत्रांतील गोंधळही समोर आले आहेत. आधार कार्डाची बायोमेट्रिक रचना पाहता अशा अडचणी दूर करण्यासाठी आधार आणि मतदार ओळखपत्रांची जोडणी, हा एक उपाय ठरू शकतो. ही जोडणी प्रत्यक्षात आली, तर मतदारांची नेमकी ओळख पटवणे आणि त्यायोगे बनावट मतदानास आळा घालणे शक्य होणार आहे. त्याबरोबरच मतदार याद्यांमधील दुबार नावे शोधून वगळणे त्यातून शक्य होईल; तसेच नाव-पत्ता अशा तपशीलांत दुरुस्ती करणे किंवा नवी मतदार नोंदणी अशी कामे मतदारांसाठी सुलभ होऊ शकतील. गेल्या काही काळात नागरिकांच्या खिशात आधार-पॅन-मतदार ओळखपत्रे अशा नवनव्या कार्डांची भरच पडत आहे, त्याऐवजी सर्वांची जोडणी करून एकच बहुउपयोगी कार्ड असावे, असाही एक विचार असून त्या दिशेने ही वाटचाल आहे. या जोडणीचे काही फायदे असून सरकार आणि निवडणूक आयोगही त्यासाठी आग्रही असले, तरी या मार्गात अनेक घटनात्मक आणि व्यावहारिक अडचणींची मालिका उभी आहे. यापूर्वीचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय पाहता निवडणूक आयोगही ङ्गही जोडणी ऐच्छिक असून, त्यातून मतदान किंवा मतदार नोंदणीचा हक्क नाकारता येणार नाही,फ असे सांगून जपूनच पावले टाकत असल्याचे दिसते. सन २०१५ मध्ये अशीच आधार व मतदार ओळखपत्र जोडण्याचा ङ्गराष्ट्रीय मतदारयादी शुद्धीकरण आणि ओळख पटविण्याचा कार्यक्रमम हाती घेण्यात आला, त्यात काही लाख कार्डांची जोडणीही झाली. मात्र, दुसरीकडे ङ्गआधारची फक्त कल्याणकारी योजना व पॅनकार्ड जोडणीपुरतीच सक्ती करता येईल,फ असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने तो बारगळला. या जोडणीबाबत विरोधक आणि अभ्यासकांचे काही गंभीर आक्षेप आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने आधार कार्डांशी पॅन-बँक खाती असा तपशील जोडलेला असल्याने नव्या जोडणीतून गोपनीयतेच्या घटनात्मक अधिकाराचे उल्लंघन होण्याची भीती व्यक्त होते. सध्या ही जोडणी ऐच्छिक असली, तरी यंत्रणांकडून त्याची सक्ती होऊ शकते, अशीही चिंता आहे. आधार हा नागरिकत्त्वाचा पुरावा नसून ते केवळ ओळख पटवणारे कागदपत्र आहे, तर मतदान हा भारतीय नागरिकास दिलेला घटनादत्त अधिकार असल्याने आधारच्या आधारे तो कसा नाकारणार, हा प्रश्न आहे. उलटपक्षी भारतीय नागरिक नसलेल्या अनेकांनी आधारकार्डे मिळविली आहेत, त्यांनी याआधारे मतदान केले तर काय, या विरोधकांच्या प्रश्नातही तथ्य आहे; तसेच सरकारी यंत्रणेकडे आधारद्वारे जमा झालेल्या माहितीची चोरी आणि गैरवापराचीही भीती आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील आधार कार्ड नसलेल्या नागरिकांचे काय, हादेखील प्रश्न आहे. या जोडणीची तरतूद असलेले विधेयक चिकित्सा समितीकडे पाठविण्याची विरोधकांची मागणी डावलून कोणत्याही चर्चेविना २० मिनिटांत मंजूर झाले होते. या तरतुदींबाबतच्या वादांची धूळ अजूनही खाली बसलेली नाही. यापूर्वी तेलंगणमधील निवडणुकीत या जोडणीच्या सॉफ्टवेअरमुळे लाखो मतदारांची नावे यादीतून गायब झाल्याचे तेथील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी म्हटले होते, अशा तांत्रिक अडचणी दूर करणे, हेसुद्धा मोठे आव्हान आहे. अशा मोहिमांबाबत नोकरशाहीचे आजवरचे अनुभव फारसे सुखावह नाहीत. यापूर्वी आधार-पॅन जोडणी, गॅस सिलिंडर, बँक खातेक्रमांक जोडणीपासून ते सध्या वाहनांच्या सुरक्षित नंबरप्लेट मिळविण्यासाठी नागरिकांच्या नशिबी हेलपाटे मनस्तापच येतो. अडचणी असल्या, तरी मतदान प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी सातत्यपूर्ण उपाययोजना आवश्यक आहेत. त्याची जबाबदारी सरकार आणि निवडणूक आयोगाचीच आहे. त्यासाठी कोणतीही नवी योजना ङ्गबुलडोझरफ पद्धतीने न राबवता सर्वपक्षीय प्रतिनिधींशी चर्चा करून मार्ग काढावा लागेल. आधार व मतदार ओळखपत्राची शंभर टक्के जोडणी झाल्याशिवाय या उद्देशांची पूर्तता होणे शक्य नाही; तर दुसरीकडे घटना व कायदे त्याची सक्ती करू देत नाहीत, असे चित्र आह

## सुंदरता व प्रेम

सुंदरता तनाची आणि मनाची. सुंदरता वागण्याची आणि बोलण्याची. वागण्या बोलण्याला आपण शिष्टाचार असे म्हणतो.

देखणेपणातले सौंदर्य वेगळे. आचरणातले सौंदर्य वेगळे. संवाद साधण्याचे सौंदर्य वेगळे. विद्वत्तेचे सौंदर्य वेगळे.

कमनीय बांधा, ठेंगणा -ठुसका बांधा, उंच बांधा, शरीर कमावलेला बांधा, स्थूल व्यक्तिमत्त्वाचा बांधा या प्रत्येक बांध्याचे सौंदर्य खूप वेगळे आहे. देखणेपणा आपल्या विचार आणि विद्वतत्तेवर अवलंबून आहे.

पूर्वीच्या काळी माणसाची विद्ववत्ता बघून, तू काय काम करतो, हे बघून मुली लग्न असतं अथवा घरातील मोठी माणसे लग्न जमवत असत.

तसेच मुलगी पाहताना तिची नाकीडोळी नीट आहे का? ती घर कामात हुशार आहे का? कुटुंब तिला आवडते का? घरादारावर प्रेम करेल का? आपले घर सांभाळेल का? इत्यादी प्रश्नांद्वारे मुलीची निवड केली जात असायची. लग्नानंतर प्रेम होतेच की, त्या लग्नातही एक ओढ असायची. लग्नानंतर आपोआप प्रेम होत असायचे. आणि ते प्रेम टिकून राहत होते. पूर्वी मुलींना दिलेली समज मदिल्या घरी तू सुखी रहा...फ या वचनात मुली बांधल्या गेल्या असायच्या. त्यामुळे पूर्ण घरादारावर प्रेमाची बरसात करायच्या. हालात दिवस काढायच्या. पण आई-वडिलांसमोर ब्र शब्द बोलायचे नाहीत. असे हे नितांत सुंदर प्रेम होते. वेडे प्रेम होते. खरंच मुलींनाही त्रास होत होता. केवळ आई-वडिलांना काही वाटू नये म्हणून मुली बोलत नसायच्या. दिल्या घरी सुखाने नांदायच्या. प्रेमाची बरसात करत राहायच्या. हे सुंदर मनाचं प्रतीक. मुली जर सासरकडच्यांनी खूप त्रास दिला तर, समाज काय म्हणेल यामुळे आईवडील स्वतःच्या मुलींना जास्त जवळ करत नसायचे. समाजाकडून काही बंधन लादली गेली होती. त्यातूनही मुलीला खूप त्रास झाला तर एखादे कुटुंब आपल्या मुलीला आपल्याजवळ ठेवायला समाजाशी चार हात करायचा हे झाले आपल्या मुलीवरचे प्रेम.

पण हल्लीच्या ह्या दिवसांमध्ये हे प्रेम पाहायला मिळत नाही. एकतर सर्व मुला मुलींना शिक्षण घेतलेला, चांगल्या पगाराचा जोडीदार लागतो. शिक्षण, विचार आणि सौंदर्य या तिन्हींचा संगम असेल तर उत्तम संसार होऊ शकतो असे त्यांचे म्हणणे असते.

परंतु काही ठिकाणी सौंदर्याला खूपच महत्त्व दिले जाते. त्या ठिकाणी त्या मुलीची विद्वत्ता किंवा कुटुंबामध्ये राहणार आहे की नाही हे पाहिले जात नाही.

हल्ली बऱ्याच मुली मुलाला अशी अट घालतात की तू परदेशी आहेस का? बाहेरगावी राहतोस का? तुझ्या आई-वडिलांबरोबर मला राहायचं नाही.

असं बोलणाऱ्या मुली खरंच संसार करू शकतील का? असा विचार बऱ्याचदा मनात येतो. मुलींना फक्त नवरा हवा आहे असे कसे चालेल. शिकले सवरलेले आहात तर कुटुंबाची जबाबदारी घ्यावी. सासरकडच्या माणसांना जवळ करावं. फक्त नवरा कसा मिळेल आपल्याला?



नवऱ्याला देखील आई-वडील आहेत ना. आई वडिलांना तो कुठे सोडणार. आपल्या आई-वडिलांप्रमणे त्याही आई-वडिलांना स्वीकारावे. त्यांच्यातील मनाचे सौंदर्य जाणावे. त्यांच्यावर प्रेम करून पहावे. जर त्यांनी प्रेम केले नाही तर मग पुढचे पाऊल उचलायला हरकत नाही. परंतु प्रेमाची परिभाषा अशी असते की तुम्ही प्रेम दिलं तर प्रेम नक्कीच मिळतं हा अनुभव आहे.

आणि पूर्वी कसं होतं आई-वडिलांनी लग्न करून दिलं की तिथेच सासरी नांदायचं. वादविवाद झाले तरी समजसपणाने तिथेच दिवस काढायचे. अगदीच विकोपाला गेले तर घटस्फोट घेऊन रिकाम व्हायचं. परंतु शक्यतो ही वेळ येत नव्हती. पूर्वीच्या गरजा मर्यादित होत्या.

पण आता काय होतंय मुलांचं सगळं विश्वच बदललेल आहे. गरजा राहणीमाना प्रमाणे बदलू लागल्या. बंगला,गाडी,कपडा- लत्ता यात खूप फरक पडला.

त्यामुळे संसाराची दोन्ही चाकं कामाला लागली. घरातल्या सुख सोयीसाठी पैसा हा कमवावा लागतोच. त्यामुळे आयटी क्षेत्रात असणाऱ्या ह्या मुलांना स्वतःसाठी वेळ देणं जमत नाही. आणि मग काय होतं प्रेमापासून ते लांब राहतात. एकमेकांना वेळ देण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नसतो. यातून एकमेकांबद्दलची ओढ कमी व्हायला लागते.

एकमेकांशी पटेनास झालं, जमत नाही असं वाटले की मग तू नाही तर दुसरा कोणी असे म्हणत घटस्फोट घेऊन रिकामे होतात. आणि जर एकमेकांना प्रेमाने बांधून ठेवला असेल तर अशा गोष्टी १००% टळतात.

तर सौंदर्य आणि प्रेम यांचा खूप जवळचा संबंध आहे. पुरुष बाईच्या सौंदर्यावर भाळतो. तर स्त्री पुरुषाच्या सौंदर्यापेक्षा त्याच्या कार्यावरती, कर्तुत्वावरती भाळते. यातूनच प्रेमाची निर्मिती होते. आणि खरे प्रेम असेल तर ते टिकते. पण फक्त शरीरावर प्रेम असेल तर मात्र ते शंभर टक्के टिकत नाही.

आजकाल व्हाट्सअप, इन्स्टाग्राम, फेसबुक इत्यादी माध्यमातून एकमेकांचा परिचय होतो. दिसायला जरा बाई छान असेल तर तिला लगेच पर्सनल मेसेज यायला लागतो. ह्या मेसेजला किती रिस्पॉन्स द्यायचा हे स्वतः बाईन ठरवावं. आणि मग या प्रेमाच्या, खोट्या प्रेमाच्या जाळ्यात का बाई अडकली तर पुरुष तिचा गैरफायदा हा घेणारच!

यासाठी स्वतः बाईने खंबीर असायला हवे. माणसं ओळखायला शिकायला हवे. समोरच्या व्यक्तीला पण रिस्पॉन्स किती द्यायचा आहे आपण ठरवायला हवे. स्त्रियांचे काय होते माहितीये का! समोरच्या पुरुषाने म्हटले तू छान दिसते, तुझा डीपी सुंदर आहे, तुझी साडी छान आहे असे म्हटले की स्त्रिया वाहवत जातात. आणि मग इथे प्रेमाची परिभाषा पार बदलून जाते. बाह्य रूपावर प्रेम करणाऱ्या व्यक्ती नको आहे. तुमच्या अंतर्मनावर प्रेम करणारा व्यक्ती हवा. असा साथीदार शोधावा. आजकालचे युग खूप वेगळे आहे.

पूर्वी एवढी सौंदर्य प्रसाधनाने नव्हती. आज काल सौंदर्यप्रसाधनांचा वापर करून आहे त्या सौंदर्यात भर घालता येते. समोरच्या व्यक्तीला त्याची भुरळ पडते.

म्हणून म्हणते सर्वांना
प्रेम करावे अंतर्मनावर
प्रेम करावे आपल्या कुटुंबावर
प्रेम करावे आपल्या सख्यावर
प्रेम करावे आपल्या मुलांवर
प्रेम करावे समाजावर
प्रेम करावे अपंगांवर
प्रेम करावे अनाथ लेकरांवर
प्रेम करावे वृद्धांवर
प्रेम करावे आपुलकीच्या माणसांवर
प्रेम करावे स्वतःवर

सौंदर्याची जपणूक आपोआप होते. आपले मानसिक सौंदर्य, विचारातील बळ आणि अंतर्मनाच्या बळावरती आपण जग जिंकू शकतो हे शंभर टक्के खरे आहे.

वसुधा वैभव नाईक
धनकवडी जिल्हा पुणे
मो. नं. ९८२३५८२११६
युवा क्रांती संघटना
पोलीस मित्र भारत
महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष.
राष्ट्रीय किसान विकास मंच
महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष...

## गुढीपाडवा

महाराष्ट्रातील चैत्र महिन्यातील शुक्ल प्रतिपदेला साडेतीन मुहूर्तांपैकी एक साजरा होणारा गुढीपाडवा आहे. हा सण मानवात अस्मिता जागृत करण्याचा सणआहे.

एकमेकांबद्दल मनांत असलेल्या द्वेषभावना,अशांतता हे सर्व विसरून यावर विजय मिळवणारा,आनंदाची पखरण करणारा हा सण आहे. या दिवशी खुप ठिकाणी एकत्रित सगळे जमतात.या दिवशी नवीन वस्तू,वास्तू, दागदागिने यांची खरेदी केली जाते. दारात बांबूच्या काठीवर उभारण्यात आलेली गुढी ही समृद्धीचे आणि विजयाचे प्रतीक मानले जाते.याच दिवशी श्रीराम चंद्रांचा १४ वर्षांचा वनवास संपला होता.,प्रजेला वालीच्या त्रासातून मुक्त केले होते.याच प्रजेने मग आनंदाने श्रीरामचंद्राचे स्वागत गुढ्या उभारून आणि दारात तोरण बांधून केले होते.तेव्हापासूनच या दिवसाला गुढीपाडवा या नावाने संबोधले जाते.नववर्षाचा हा पहिला दिवस पवित्र मानला जातो

आंध्रप्रदेश आणि कर्नाटकात हा दिवस विजयदिन म्हणून साजरा करतात,या दिवशी गौतमीपुत्राची सत्ता असलेल्या देशात स्वातंत्र्य प्राप्तीचा आनंद त्यांना मिळाला.देशात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या नावाने हा उत्सव साजरा केला जातो.

महाराष्ट्रातील बांबूची ही गुढी एका अर्थाने पर्यावरणाचे अस्तित्व टिकवून ठेवते.गुढी ही आकाशाच्या दिशेने उभारली जाते.याचा उद्देश्य हा कि आपली महत्त्वाकांक्षा ही आकाशात उंच झेप घेण्याची असावी. गुढीत वापरले जाणारे कडुलिंब,नवीन रेशीम वस्त्र आणि साखरेच्या गाठेची माळ ही मानवाच्या गरजेची प्रतिके आहेत.



आज ही काही गावात गुढीपाडवा या दिवशी मोठी सभा भरते आणि सगळे गाववाले एकत्र येऊन वार्षिक सार्वजनिक कार्यक्रमाची आखणी करतात ,गावात रामनवमीचा दिमाखदार सोहळा अगदी भारूड आणि रामलीला रंगीत वेशभूषेत पार पाडतात.गावात जत्रा ही भरली जाते. गुढीपाढवा हा सण खरोखरचं सर्वांच्या अंगात नवचैतन्य निर्माण करून टाकते.राममंदिर संपूर्ण रोषणाईने सजवले जाते.सगळे गाव कार्यक्रम पाहण्यासाठी इथे एकत्रित जमा होते. खरचं माणूसकीचे दर्शन घडते.आणि म्हणूनच म्हणतात गुढीपाडवा सण मोठा नाही आनंदाचा तोटा .

आजच्या आधुनिक युगात सर्वांच्या हातात मोबाईल व इंटरनेटमुळे माणसे माणसांशी बोलताना क्वचितचं दिसतात.तरीही हा सण मात्र गुढी उभारून घरोघरी साजरा केला जातो. आजच्या या दिवशी गुढीपाडवा सण मोठा नाही आनंदाचा तोटा,हे म्हणणे सार्थ करून,जे भुकेले आहेत त्यांना अन्नदान करू ,आश्रमात जाऊन मुलांना खाऊ घालू. अर्थात जमेल तसे सर्वांनीच आनंदी व्हायला हवे.आपण आपले धरतीवरचे ऋण थोडे तरी फेडू. आणि हा सण आनंदाने साजरा करू. नवीन वर्षाच्या अर्थात गुढीपाडव्याच्या आपणां सर्वांस खुप खुप मनापासून शुभेच्छा..

लेखिका अनिता कळसकर कल्याण*
जिल्हा-ठाणे
मो.नं-९७६९१४००११

## अनु उवाच...४३ यशाचे गमक.

ममी यशस्वी होणारचफ हा यशाविषयीचा दृढ आत्मविश्वासच आपणांस अंधारातून देखील मार्ग चालत राहण्यास स्फूर्ती देतो.यश मिळवायचे असेल तर वृत्तीला अनुसरुन ध्येय बाळगले पाहीजे. एखाद्या कामाची जबाबदारी टाकली म्हणजेच माणूस कार्यान्वीत होतो. करायला सुरवात झाली म्हणजेच यश मिळते. स्वतः प्रत्यक्ष काही करून पाहील्याशीवाय आत्मविश्वास वाढत नाही आणि आत्मविश्वास असल्याशीवाय स्वतः जबाबदारी घेण्याची इच्छा होत नाही. सावधपणानं केलेल्या कामातही पुष्कळदा अपयश येतं. म्हणून विचारांचा तोल सांभाळत निर्णय घेतला पाहीजे.पराजयावरही मात करून यशस्वी वाट शोधणं हा माणसांचा गुण असावा.प्रयत्नां ऐवजी निष्क्रिय दैवाला अवास्तव महत्त्व देण्याची मनोवृत्तीच आपणांस नेहमी अपयशी बनवित असते. कर्तृत्वाची पराकाष्ठा करावयाची यश प्राप्त करावयाचे परंतु यशाची पताका मिरवायची नाही. न बोलता




समर्पणाच्या समाधानात संतुष्ठ राहावयाचे हा खरा मार्ग असतो. हा कष्टसाध्य मार्ग ज्यांनी साधला त्यांच्या सुखाला कशानेही आणि कधीही कमीपणा येत नाही. यशाचे खरे गमक कोणते असेल? तर हे की, दुसऱ्याचा दृष्टीकोण समजून घेण्याची शक्ती असणे. व एखाद्या गोष्टीकडे त्याच्या व स्वतःच्या दृष्टीकोणातून पाहणे.

हिरकणी सौ.अनिता गुजर
डोंबिवली

## माहूर गडावरील स्कायवॉक प्रकल्पांची जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडून पाहणी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-माहूर : श्री रेणुकामाता मंदिरामुळे महाराष्ट्राच्या अध्यात्मिक धार्मिक तसेच वन पर्यटनाच्या नकाशावर आलेल्या माहूरच्या विकासामध्ये कोणताही खोळंबा होता कामा नये. त्यासाठी सर्व क्षेत्रातील नागरिकांनी एकत्रित येऊन काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी येथे केले. महाराष्ट्रातील भाविकांचे आराध्य दैवत असणारे माहूर येथे उभारण्यात येत असलेल्या स्कायवॉकच्या कामाची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले माहूर गडावर पोहचले होते. त्यांनी यावेळी व्यापारी व स्थानिक नागरिकांशी सुरू असलेल्या प्रकल्पाबाबत चर्चा केली. स्कायवॉक हा प्रकल्प माहूरच्या वैभवात भर टाकणारा असून यामध्ये ज्या लोकांना आपली जागा द्यावी लागेल त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून दिली जाईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी त्यांनी सुरू असलेल्या कामाची माहिती जाणून घेतली. आध्यात्मिक, धार्मिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक असणारे बदल वेळोवेळी करतांना स्थानिक नागरिकांचे म्हणणे लक्षात



घ्यावे, अशी सूचना त्यांनी यावेळी केली. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कोरे, तहसीलदार किशोर यादव, मुख्याधिकारी विवेक कांडे, गटविकास अधिकारी सुरेश कांबळे, मंदिर विश्वस्त उपस्थित होते. या ठिकाणी उभारल्या जात असलेला लिफ्ट व स्कायवॉकच्या कामाची पाहणी, गडावरील दुकानदारांच्या समस्या, रस्त्याचे विस्तारीकरण, सुशोभीकरण तसेच माहुरच्या विविध ठिकाणी भेटी देताना श्रद्धाळू व पर्यटकांना येणाऱ्या अडचणी याबाबत त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांशी, विश्वस्तांची चर्चा केली.

प्राचीन ऐतिहासिक संदर्भ असणाऱ्या माहूरगड यासारख्या लोकप्रिय पर्यटन स्थळाला जिल्ह्याच्या वैभवात भर घालणाऱ्या सोयी-सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत. या परिसरातील अतिक्रमण, फेरीवाल्यांच्या समस्या आणि सर्व प्रलंबित प्रकल्प काल मर्यादित पूर्ण करण्यात यावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. तत्पूर्वी त्यांनी माहूर गडावर रेणुका मातेचे दर्शन घेतले यावेळी मंदिरांच्या विश्वस्तांनी त्यांचे स्वागत केले.

## करवीर काशी फौंडेशनचा अभिनव उपक्रम-सार्वजनिक वाचनालय,ग्रंथलयांसाठी दिवाळी अंक,कविता संग्रह,कथासंग्रह भेट देणार



कोल्हापूर(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)येथील करवीर काशी फौंडेशन ही संस्था गेली२५वर्षे साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असून यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहे.यानिमित्ताने जुने,तसेच चालु,संग्राह्य माहितीपूर्ण दिवाळी अंक व काव्यसंग्रह तसेच कथासंग्रह सार्वजनिक वाचनालय,ग्रंथलयांसाठी भेट म्हणून देण्याची योजना संस्थेने जाहीर केले आहे.वाचनालयांना,ग्रंथलयांना हवे असलेले दिवाळी अंक,कवितासंग्रह,कथासंग्रह निवडुन मिळतील असे नाही,तसेच चांगल्या दर्जेदार अंकांचा समावेश असलेल्या या योजनेत बाहेर गावच्या वाचनालय व ग्रंथपाल यांनी एका अंकासाठी किंवा एका कवितासंग्रहासाठी पोस्टेज खर्च व बांधणी खर्च म्हणून प्रत्येकी रुपये३०/-प्रमाणे मनी ऑर्डर करावी,असे आवाहन करवीर काशी फौंडेशनचे अध्यक्ष डॉ.सुनीलकुमार सरनाईक यांनी केले आहे.संपर्कासाठी पत्ता-करवीर काशी फौंडेशन,पैस,रि.स.न.७४६/१,वसंतराव सरनाईक पार्क,देवकर पाणंदनजिक,पोष्ट कळंबा,कोल्हापूर-४१६००७मोबाईल नं.९४२०३५१३५२

# रोड रॉबरी करून पळुण गेलेल्या आरोपीला पोलीसांनी ठोकल्या बेड्या

गेवराई। प्रतिनिधी गेवराई हुन तालुक्यातील रोहितळ येथे दुचाकी वरून जाणा-या एकाला दोन जणांनी रस्त्यावर आडवुन मारहाण करून बळजबरीने खिशातील ४० हजार रूपये काढुन घेवुन पळुन गेलेल्या दोन आरोपी पैकी एकाला गेवराई पोलीसांनी पकडुन ताब्यात घेतले असुन एक जण फरार झाला आहे.या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ज्ञानेश्वर महादेव येलजाळे वय ३७ राहणार रोहितळ हे बुधवार रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास गेवराईहुन आपल्या दुचाकी वरून रोहितळ कडे जात असताना केकतपागंरी जवळ दोन अनोळखी मोटरसायकल स्वारांनी त्यांना आडवुन मारहाण करून त्यांच्याकडील रोख रक्कम ४० हजार रुपये बळजबरीने काढून घेत पळुन गेले.त्यानंतर ज्ञानेश्वर येलजाळे यांनी गेवराई पोलीस ठाण्यात येवुन हकिगत सांगुन आरोपीचे वर्णन सांगितले. तेव्हा लगेच पोलीसांनी केकतपागंरी शिवारात शोध घेत आरोपी अजय जगन्नाथ चव्हाण राहणार केकतपागंरी याला ताब्यात घेतले तर दुसरा आरोपी सचिन राठोड फरार झाला असुन पकडलेल्या आरोपी व त्याचा साथीदार सचिन राठोड याच्या बरोबर केला असल्याची कबुली दिली आहे.आरोपी कडुन गुन्हात वापरलेली दुचाकी पोलीसांनी जप्त केली

# जागतिक महिला दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ सारसबाग कडून विमलाबाई लुंकड विद्यालयातील शिक्षकांचा सत्कार

जागतिक महिला दिनानिमित्त विमलाबाई लुंकड विद्यालयातील डायस प्लॉट गुलटेकडी पुणे ३७ या ठिकाणी भव्य दिव्य कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी सावळ्याची जणू सावली व सावली होईन सुखाची या दोन मराठी मालिका मधील बाल अभिनेता सर्वेश जाधव व त्याची आई पूजा जाधव यांची शाळेत उपस्थिती होत्या. रोटरी क्लबच्या मा.श्वेता शहा व माननीय जया ताई देशपांडे यांनी शाळेतील सर्व शिक्षकांचे व मुख्याध्यापक सरांचा सत्कार केला व कौतुक केले

जागतिक महिला दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थिनी विविध भूमिकेच्होया वेशभूषेत जसे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, अंतराळवीर कल्पना चावला, पहिल्या मुस्लिम शिक्षिका फातिमा शेख ,राजमाता जिजाऊ इत्यादी. सर्वेश जाधव यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांसोबत सुसंवाद केला ॲक्टिंगचा छंद आईने जोपासला व त्यामुळे अभिनयाची संधी उपलब्ध झाली असे सर्वेशने सांगितले त्याचा व आई पूजा जाधव यांचा सत्कार उपस्माथित म न्यवरांच्या हस्ते करण्यात आला. पूजा जाधव यांनी विद्यार्थ्यांशी स्पीच टेक्निक याबद्दल चर्चा व



मार्गदर्शन केले. माजी शिक्षक विस्तार अधिकारी श्रीमती सुभा लोंढे ताई व सुप्रसिद्ध गझलकारा कविता ताई काळे यावेळी प्रम ुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. यांनी विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन केले

स्त्रीदर्पण २०२५ हा विशेषांक जागतिक महिला दिनानिमित्त असलेल्या महिलांवर आधारित लेख व कवितांचा संकलन अस्मिताताई पुष्पांजली यांनी केले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. स्त्रियांवर आधारित हे पुस्तक सर्व उपस्थित पालक महिलांना देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी जेष्ठ विचारवंत महिला सत्यभामा मून व उषा भरणे यांची उपस्थिती होती

विद्यार्थ्यांना जागतिक महिला दिनानिमित्त उत्तम मार्गदर्शन व शिक्षणाचा ध्यास याविषयी शाळेचे मुख्याध्यापक श्री संदीप सातपुते सर यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका जयश्री सोमवंशी यांनी केले कार्यक्रमाची प्रस्तावना आदरणीय कवयित्री सुनिता पवार यांनी केले. आभार प्रदर्शन शिक्षिका कवयित्री संगीता चौधरी मॅडम यांनी केले.कार्यक्रमाचे आयोजन कांचन भरणे व मुख्याध्यापक सर यांनी केले.

# राहुल सोनवणे यांच्या मध्यस्थीने आंदोलन मागे



बीड। प्रतिनिधी सिरसमार्ग ता. गेवराई येथे जायकवाडीच्या हक्काच्या पाण्यासाठी गेली १८ दिवसापासुन सुरू असलेल्या जवळपास १४० गावच्या लोकलढा आंदोलनास आज काँग्र`ेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात आंदोलनकर्ते दिनेश गुळवे, पप्पु रडे, देविदास चव्हाण यांची आस्थेवाईक पणे चौकशी केली. खासदार रजनीताई पाटील, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना तत्काळ भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधत विषयाचे गांभीर्य लक्षात घेता तत्काळ कारवाई करण्याची विनंती केली व आंदोलन कर्त्यांना उपोषण सोडण्याची विनंती केली. आंदोलनकर्त्यांनीही सहमती दर्शवत राहुल सोनवणे व प्रशासनातील अधिकारी यांच्या उपस्थितीत लिंबू शरबत घेऊन उपोषण मागे घेतले. त्याचबरोबर आंदोलनकर्त्यांचे शिष्टमंडळ घेऊन जलसंपदा मंत्री मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील व संबंधित अधिकार्यांशी भेट घालुन देण्याचेही आश्वासन दिल

# दहिसर मध्ये कवितेचा साक्षात्कार समुहा च्या वतीने कवी संमेलन मोठ्या जल्लोषात संपन्न झाले.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम.दहिसर पश्चिम येथील पंडीत दिनदयाळ उपाध्याय गार्डन,आर नार्थ मनपा वार्ड कार्यालया जवळ येथे कवितेचा साक्षात्कार समुहाच्या वतीने शनिवार दिनांक १५ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता मोठ्या उत्साहात जल्लोषात संपन्न झाले. सुरुवातीला लेखक अशोक म हाजन यांनी आपल्या साहित्यिक प्रवासातील अनुभव कथन केले , यावेळी त्यांनी पुस्तक प्रकाशित कसे करावे? याबाबत माहिती दिली.कवितेचा साक्षात्कार सम ुहाचे प्रमुख चंद्रशेखर परांजपे यांची तब्येत ठीक नसतानाही त्यांनी कवि संमेलनाचे आयोजन करुन उपस्थित कवि कवयित्री मध्ये जोश, चैतन्य निर्माण केले, तर लेखक अशोक महाजन यांनी सुध्दा आजारी असून ही मोठ्या उत्साहात कवि संमेलनात भाग घेतला.या कवि संमेलनात कवी कवयित्रीनी आपल्या विविध आशयाच्या, विषयांच्या कविता सादर केल्या.रंगपंचमी, घटस्फोट, पंढरीची वारी,भावा बहिणीचे



नाते, प्रेमाच्या, नात्यांच्या, निसर्ग,भाव भावनांच्या,कवितांचा अक्षरशः पाऊस पडत असल्याचे जाणवत होते, एकंदरीत कवी संमेलन मोठ्या जल्लोषात उत्साहात पार पडले,या संमेलनात चंद्रशेखर परांजपे, अशोक महाजन, पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ता भारत कवितके,श्याम यादव, आशा गोसावी,सरोज गाजरे, सुजाता चिटणीस,निवेदिता थत्ते, कल्पना म्हापुसकर, रविंद्र पाटील, राजेंद्र वाणी , सुनिता परब, संजना वेतुरकर, सुजाता साळवी,रश्मि निर्मलकुमार, सुरेश चौबे, शांतीलाल ननावरे, गणपत चव्हाण,कुणाल राऊत, शुभांगी गादेगांवकर, प्रविण जाधव आणि इतर कवी कवयित्रीनी आपल्या कविता सादर केल्या.एकंदरीत काव्य संमेलन मोठ्या उत्साहात जल्लोषात संपन्न झाले.

# माऊली गिरीच्या मारेकऱ्यांना कडक शासन करा-दादासाहेब गिरी




गेवराई। प्रतिनिधी धाराशिव जिल्ह्या-तील भुम तालुक्यातील दुधोडी गावातील माऊली बाबासाहेब गिरी या युवकांची प्रेम प्रकरणातील संशया-वरून दि.३ मार्च रोजी अमानुष हात्या करण्यात आली आहे यांचा सर्व समाजाच्या वतिने जाहीर निषेध व्यक्त होत असून माऊली गिरीच्या मारेक-यांना अटक करून फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी बीड जिल्हा शिववंशिय दसनाम गोसावी समाज संस्थेच्या वतिने दादासाहेब गिरी, गंगाधर पुरी, संतोष भारती,अनिल गिरी,अंबादास गिरी, दत्ता गिरी, विनायक गिरी,आदिनी प्रशासनाकडे केली आहे. याविषय आधिक माहीती अशी की धाराशिव जिल्ह्य़ातील भुम तालुक्यातील दुधोडी येथील माऊली बाबासाहेब गिरी यांची प्रेम प्रकरणा-तील संशयावरून अमानुष हात्या करण्यात आली या घटनेने महाराष्ट्रात हाळहाळ व्यक्त होत आहे तर महाराष्ट्रा-तील दसनाम गोसावी समाजांच्या वतिने ठिकठिकाणी निषेधार्थ उपोषण धरणे आंदोलन करण्यात येत असून जनतेत संताप व्यक्त होत आह

# कांदिवली मध्ये भारतीय जनता पार्टी च्या वतीने शिवजयंती उत्सव मोठ्या जल्लोषात पार पडला.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. कांदिवली पश्चिम मध्ये भारतीय जनता पार्टी विधानसभा अध्यक्ष बाळा तावडे आयोजित शिवजयंती उत्सव मोठ्या जल्लोषात उत्साहात पार पडला.सालाबादप्रमाणे या वर्षी ही सोमवार दिनांक १७ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता मा.नगरसेवक चारकोप विधानसभा अध्यक्ष बाळा तावडे यांच्या कार्यालया जवळ स्व.गोपीनाथ मुंडे चौक, हिंदूस्थान नाका जवळ कांदिवली पश्चिम या ठिकाणी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात जल्लोषात पार पडली.या शिवजयंती निमित्त मूर्ती ची प्राणप्रतिष्ठा, मूर्ती पूजन, पुष्पहार अर्पण करणे,शिव आरती, महाराष्ट्र गीत, मान्यवरांचे स्वागत सत्कार, ढोल ताशा पथक सादरीकरण ,प्रा.डी.एन.पाटील हायस्कूलच्या विद्यार्थी



विद्यार्थीनींनी महाराष्ट्र राज्याचे प्रसिद्ध नृत्य लेझीम नृत्य सादर केले, या मध्ये शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता, मल्लखांब प्रात्यक्षिके अशी कार्यक्रमाची रूपरेषा होती, या वेळी मंडळ अध्यक्ष बाळा तावडे यांनी प्रास्ताविक मध्ये उपस्थित मान्यवरांचे म्हणजे मा.खासदार गोपाळ शेट्टी यांचे आभार मानले,मा.खासदार गोपाळ शेट्टी यांनी शिव मूर्ती ला पुष्पहार अर्पण करून मानाचा मुजरा केला, यावेळी मा.खासदार गोपाळ शेट्टी यांनी सांगितले की,ङ्क निवडून आलेल्यांनी अशा उत्सवात सहभागी व्हायला हवे पण तसे होत नाही, नेत्यांचा दबदबा असल्याशिवाय लोक जमा होत नाही, शिवजयंती मुळे प्रत्येक जण उत्साहीत होतो,त्यांना प्रोत्साहन मिळते,मी खासदार असताना दर १२ तारखेला आयोग बसायचा,तो आता बंद झाल्याने खंत वाटते,ङ्ख या प्रसंगी मा.खासदार गोपाळ शेट्टी, बाळा तावडे,मा.नगरसेवक कमलेश यादव आदी उपस्थित होते, तर संजय सिंह, योगेश पडवळ,आर. एस.वर्मा, गिरी, भारत कवितके, दिनेश जैस्वार,सागर जाधव, चंद्रकांत सुर्वे, विवेक हडकर,सह अनेक पुरुष व महिला कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# सिद्धेश्वर महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने अर्थ साक्षरता कार्यशाळा संपन्न.

श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव , अर्थशास्त्र विभाग आणि जन शिक्षण संस्थान बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आर्थिक साक्षरता अंतर्गत स्मार्ट निवेश जागरूकता कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यशाळेचे उद्घाटन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे स्थानिक समन्वय समि तीचे कार्यवाह ॲड विश्वास जोशी यांनी केले. या कार्यशाळेच्या प्रमुख वक्त्या या अनुया देशपांडे व सुवर्णा कवठेकर / देशमाने या होत्या. या कार्यशाळेचे अध्यक्ष प्राचार्य प्रो.डॉ. मुकुंद देवर्षी होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रो.डॉ.महेश देशमुख यांनी केले. या कार्यशाळेसाठी प्रमुख उपस्थिती म्हणून श्री .पवन म ानधने, डॉ. गजानन होन्ना, प्रा. चव्हाण तसेच मोठ्या प्रमाणात महिला आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

या कार्यशाळेचा मुख्य उद्देश हा मुलींम ध्ये, महिलांमध्ये आर्थिक साक्षरता वाढवणे आणि भारतीय शेअर बाजाराची ओळख करून देणे हा होता. आर्थिक साक्षरता कार्यशाळे अंतर्गत स्मार्ट निवेश जागरूकता कार्यशाळेत अनुया देशपांडे यांनी ऑनलाइन लाइव आपल्याकडे असलेला पैसा शेअर मार्केटमध्ये कसा सुरक्षित गुंतवावा याबाबत प्रशिक्षण दिले. प्रशिक्षणात सुरुवातीला त्यांनी बचत आणि गुंतवणूक यातील फरक तसेच बी. एस. इ.चा इतिहासही सांगितला. शेअर बाजारात प्राथमिक शेअर बाजार आणि दुय्यम शेअर बाजारातील फरक स्पष्ट केला. शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी पॅन, डिमॅट अकाउंट असणेही गरजेचे आहे याचाही उल्लेख केला. ते कसे उघडावे याचेही प्रशिक्षण दिले

# गोपीनाथ खोले यांचे दुःखद निधन

माजलगाव-प्रतिनिधी शहरातील रंगार गल्ली भागातील रहिवासी असलेले गोपीनाथ केशवराव खोले वय ८५ वर्ष यांचे वृद्धापकाळाणे दि.२० मार्च २०२४ रोजी पहाटे निधन झाले आहे. शहरातील झेंडा चौक भागातील रंगार गल्ली येथील ज्येष्ठ रहिवासी असलेले गोपीनाथ केशवराव खोले हे खोले मामा म्हणून सर्वपरिचित होते. वयाच्या सोळाव्या वर्षापासून त्यांनी मोंढ्यात मोगरेकर किराणा, मराठा बियर बार, शेजुळ आडत दुकान, केचाळे डेकोरेशन, कॅसेट, पान सेंटर, भांडी भंडार आदी ठिकाणी काम केलेले आहे तर न्यायालयात अनेक वेळा त्यांनी केलेला हिशोब ग्राह्य धरला जायचा. त्यांच्या पार्थिवावर सिंदफना नदी तीरावरील स्मशानभूमीत दुपारी चार वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, भाऊजया, दोन मुले, चार मुली, दोन पुतणे, सहा पुतण्या, जावई, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. येथील प्रेस फोटोग्राफर प्रसाद खोले व प्रशांत खोले यांचे ते वडील तर सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी प्रभाकर खोले यांचे ते मोठे बंधू होत

# राष्ट्रीय बाल कवयित्री अजया अजित मुळीक वर्ल्ड पोएट्री पुरस्काराने सन्मानित

पुणे : 15मार्च2025 " आत्ताची जी 12..13 वर्षाची उमलती बाल कवी कवयित्रिंची पिढी आहे , त्यात उद्याचे शांता शेळके - इंदिरा संत-कुसुमाग्रज - मंगेश पाडगावकर पहायला मिळतात.2035 ची कविता अधिक प्रगल्भ पहायला मिळावी हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेऊन आत्ताच्या बाल कवीकवयित्रींना सातत्याने व्यासपीठ मिळावे या साठी ज्येष्ठ साहित्यिकांनी प्रयत्नशील रहावे " असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी आणि वर्ल्ड पोएट्री संस्थेचे संस्थापक आणि अध्यक्ष डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी केले. संस्थेतर्फे नुकतेच "वर्ल्ड पोएट्री" हे निमंत्रितांचे काव्यसंमेलन आयोजित करण्यात आले होते , या संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ.मधुसूदन घाणेकर मार्गदर्शन करीत होते.संमेलनाचे उदघाटन आंतरराष्ट्रीय पातळीवरील बालकवयित्री अजया मुळीक हीच्या हस्ते करण्यात आले. डॉ.मधुसूदन घाणेकर यांच्या शुभहस्ते निमंत्रित कवी कवयित्रींना 2025 च्या वर्ल्ड पोएट्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी तितिक्षा इंटरनॅशनल संस्थेच्या संस्थापक-अध्यक्षा प्रिया दामले प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कोवळ्या काव्य पिढीवर भारतीय संस्कृतीचा प्रभाव पहायले मिळणे हे निश्चितच साहित्य क्षेत्रातील भावी काळातील साहित्य क्षेत्राच्या उत्कर्षाचे संकेत आहेत असा सूर



वर्ल्ड पोएट्री संमेलनातून निघाला. मला कवितेमुळे खुप आनंद मिळतो आणि कवितेचा ध्यास घेऊन मी अधिक चांगली कविता करेन असे राष्ट्रीय बाल कवयित्री अजया मुळीक हीने संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी सांगितले. वसुधा नाईक, अनघा सावनूर आगाशे, मंदाताई नाईक, सारिका सासवडे ,प्रीति दबडे, मनीषा ठाकूर, प्रतिमा काळे, दीपराणी गोसावी , भावना गुप्ता, बाबा ठाकूर, योगेश हरणे, गौरव पुंडे , विनोद अष्टूळ, शामला पंडित, धनंजय इंगळे ,श्रीराम घडे आदि 25 मान्यवर कवी कवयित्रींनी धुलीवंदनाची काव्यसंध्या रंगवली. सारिका सासवडे यांनी आभार मानले. संमेलनाचे औचित्य साधून डॉ.मधुसूदन घाणेकर संपादित विश्वविक्रमी ' डहाळी ' अनियतकालिकाच्या 670 व्या विशेषांकाचे प्रकाशन तितिक्षा इंटरनॅशनल च्या संस्थापक अध्यक्षा प्रिया प्रमोद दामले , अजया मुळीक, वसुधा नाईक, सारिका सासवडे, मंदाताई नाईक आदि मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. पैशाला नसते जात , पैशाला नसतो धर्म या अजया मुळीकच्या कवितेने उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. इंद्रधनुष्याला सात रंग पण मनाला हजार रंग या डॉ.मधुसूदन घाणेकर यांच्या कवितेने संमेलनाचा समारोप झाला.

# मा. मुख्यमंत्र्यांचा लाडका विभाग हा कौशल्य विकास विभाग कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांचे विधान परिषदेत प्रतिपादन

मुंबई, २१ मार्च : महाराष्ट्राचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मा. श्री. मंगल प्रभात लोढा यांनी आज विधान परिषदेत २६० च्या प्रस्तावास उत्तर देताना राज्यातील युवा उद्योजकता आणि कौशल्य विकासाला चालना देणा-या महत्त्वाच्या निर्णयांची घोषणा केली. पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी यांच्या दूरदृष्टीने आणि मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीसजी यांच्या सक्षम नेतृत्वामुळे महाराष्ट्रात कौशल्य विकास आणि उद्योजकतेला अभूतपूर्व गती मिळत आहे. तरुणांना संधी देण्याचे, पारंपारिक कौशल्यांना नवे रूप देण्याचे आणि उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्याचे हे सुवर्णयुग आहे. त्यांचे मार्गदर्शन आणि पाठिंब्यामुळे महाराष्ट्र सक्षम, आत्मनिर्भर आणि पुढारलेले राज्य बनत आहे. मा. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली दावोसमधून, आपल्या राज्याला विक्रमी गुंतवणूक मिळाली. त्यामधून आज नवी मुंबई येथे इनोव्हेशन सिटी उभारण्याचे काम सुरु झाले असून, हा मा. मुख्यमंत्र्यांचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. मा. मुख्यमंत्र्यांच्या पुढाकारामुळे आज राज्याला एक नवे स्टार्टअप धोरण मिळणार असून, ही नवीन उद्योजकांसाठी अतिशय महत्वपूर्ण बाब आहे. आज नमो रोजगार मेळावे, युवा कार्य प्रशिक्षण योजना, कौशल्य विकास केंद्र, म हिला उद्योजकांना आर्थिक सहाय्य, विदेशात युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, या सारखे अनेक प्रकल्प मा. मुख्यमंत्र्यांच्या पाठिंब्यामुळे कौशल्य विकास विभागाला राबवता आले. मा. मुख्यमंत्र्यांचा लाडका मंत्री कोण हे तेच ठरवतील पण कौशल्य विकास विभाग, हा त्यांचा लाडका विभाग आहे आणि त्यामुळेच इतके उपक्रम शक्य झाले!, असे कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी यावेळी बोलताना सांगितले.

राज्यातील कौशल्य विकासासाठी महत्वाच्या घोषणा

*Startup Next Door* : महाराष्ट्र सरकारच्या "Startup Next Door' या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत १ लाख नव्या स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या योजनेमुळे स्थानिक स्तरावर नव्या व्यवसायांना चालना मिळेल आणि स्टार्टअप संस्कृती अधिक बळकट होईल.

विश्वकर्मा भवनः महाड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत १२ बलुतेदार समाजासाठी ङ्कविश्वकर्मा भवनफ स्थापन करण्यात येणार आहे. या उपक्रमातून परंपरागत व्यवसायांना तंत्रज्ञानाची जोड मिळेल आणि कौशल्याधारित रोजगाराच्या संधी वाढतील.

खढख विकासासाठी नवीन उपक्रमः येत्या वर्षभरात महाराष्ट्रातील १०० खढख संस्था, आस्थापना आणि स्वयंसेवी संस्थांना प्रायोगिक तत्वावर दत्तक देण्यात येणार आहे. यामुळे उद्योगांसोबत संस्थांचा थेट संबंध निर्माण होऊन विद्यार्थ्यांना अद्ययावत प्रशिक्षणाची संधी मिळेल.

ट्रेन द टीचर्स भवनः ITI मधील शिक्षकांना नवीन कौशल्यांमध्ये प्रशिक्षण देण्यासाठी विशेष ङ्कट्रेन द टीचर्सफ भवन स्थापन केले जाणार आहे. हे केंद्र आधुनिक उद्योगाच्या मागणीनुसार शिक्षकांना प्रशिक्षित करून विद्यार्थ्यांना उत्कृष्ट प्रशिक्षण देण्यासाठी मदत करेल. नवीन शैक्षणिक धोरणः महाराष्ट्र हे शासकीय औद्योगिक संस्थांमध्ये नवीन शैक्षणिक धोरण प्रभावीपणे राबवणारे पहिले राज्य ठरणार आहे. या धोरणामुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे आधुनिकीकरण होईल आणि विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक कौशल्ये मिळतील.

# प्रतिभावंतांनी नाट्यपदं लिखाणावर भर द्यावा...क्षमा वैद्य



पुणे : २१ मार्च २०२५प्रतिभावंत साहित्यिकांनी नाट्यपदं लिखाणावर अधिक भर द्यावा.तसेच नाटकांच्या संहिता लिहाव्यात.ङ्ख असे प्रतिपादन ज्येष्ठ नाट्यचित्रपट अभिनेत्री क्षमा वैद्य यांनी केले. तितिक्षा इंटरनॅशनल आणि श्रिदा क्रिएशन या संस्थांनी संयुक्तरित्या तितिक्षा दशकपूर्ती वर्ष आणि जागतिक काव्यदिनानिमित्त निमंत्रितांचे विशेष काव्यसंमेलन आयोजित केले होते , याप्रसंगी प्रमुख अतिथी या नात्याने क्षमा वैद्य आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होत्या.रंगकर्मी स्व.प्रमोदजी दामले ,स्व. प्रभाकर पणशीकर , स्व.अरुण सरनाईक , मेहमुद आणि दादा कोंडके आदिंच्या आठवणीही त्यांनी याप्रसंगी सांगितल्या.स्वागत आणि प्रास्ताविक संस्थापक, अध्यक्ष आणि अभिनेत्री प्रिया दामले यांनी केले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून डॉ. घाणेकर संपादित विश्वविक्रमी डहाळी अनितकालिकाचा ६७८ वा विशेषांकही मान्यवरांच्या शुभहस्ते प्रकाशित करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्त्या मंदा नाईक तसेच सुप्रसिद्ध रंगकर्मी सतीश इंदापूरकर , विनोद अष्टुळ , विठ्ठल मूरकेवार याप्रसंगी उपस्थित होते. प्रमोद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. सचिव अजिता मुळीक आणि बाल सचिव कवयित्री अजया मुळीक यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. ऋचा कर्वे , अजया मुळीक , प्रिती दबडे , आशा कामे , वसुधा नाईक , मधुकर्णिका सासवडे, डॉ. निर्मला राजपूत , सुनील जोशी , बाबा ठाकूर , दीपराणी गोसावी , योगेश हरणे , प्रतिमा काळे , गणपत तरंगे , योगिता कोठेकर आदि ५० मान्यवरांनी काव्यसंमेलन रंगवले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २२ मार्च २०२५
https://lokaarambh.com



## महाराष्ट्रचा उत्कृष्ट कवी, कवयित्री स्पर्धा क्र. २३ चा निकाल घोषित

**महाराष्ट्राची उत्कृष्ट कवयित्री ठरल्या काव्यअरुणा मा.सौ.सुनिता दिपक पडवळ. पुणे जन्मभूमी येरफळे गाव ता.पाटण जिल्हा सातारा**

परिवर्तनाची मशाल – क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या विषयावर काव्यलेखन स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत महाराष्ट्रातील अनेक कवी/कवयित्री सहभागी झाले होते. ङ्गसम्यक दर्शन साहित्य राज्यस्तरीय मंचङ्ख यांचे तर्फे आठवडी काव्यलेखन स्पर्धा क्र.२३ ही १४ मार्च २०२५ ते १८ मार्च २०२५ या दरम्यान घेण्यात आली होती. या काव्यलेखन स्पर्धेत

महाराष्ट्राची उत्कृष्ट कवयित्रीचा सन्मान कवयित्री सौ. सुनिता पडवळ, पुणे यांनी मिळवला. त्या जिजाऊ ब्रिगेड संस्थेच्या सदस्य असून व्याख्यानाद्वारे सामाजिक कार्य करीत आहेत. त्यांचे अनेक साहित्य समूहात काव्यलेखन सुरू असून आजवर अनेक साहित्य सन्मान मिळाले आहेत. आजवर अनेक ऑनलाईन पुरस्कार त्यांना मिळाले असून सर्व श्रेणीतील विजेता सन्मान सुद्धा मिळाला आहे. विजेत्या कवयित्री सौ. सुनिता ताईचे समूहाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले व भविष्यकालीन वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

सम्यक दर्शन साहित्य समूहाचे संस्थापक देविदास गायकवाड तसेच सौ. सुनिता तागवान है आहेत तसेच सुजाता उके ह्या प्रशासिका आहेत.

# बीड मतदारसंघातील प्रश्न आ.क्षीरसागरांनी सभागृहात गाजवले

मुंबई-प्रतिनिधी बीड मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडू न आ.संदीप क्षीरसागरांनी गुरूवारी (दि.२०) रोजी सभागृहाचे लक्ष वेधले. मतदारसंघात विकासकामांना मिळालेला निधी कोविड काळात वळविल्याने रखडलेली कामे, ग्रामीण भागातील शाळांची दुरूस्ती करणे तसेच विविध सोयी-सुविधा उपलब्ध करणे, रस्ते दुरुस्ती, पुल दुरूस्ती करणे आदी मुद्दे आ.क्षीरसागरांनी अधिवेशनात गाजवले. बीड मतदारसंघात असलेले श्री क्षेत्र कपीलधार देवस्थान हे संपूर्ण महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरून देखील भाविक याठिकाणी येत असतात. कोवीड काळाअगोदर श्री क्षेत्र कपीलधार




देवस्थानच्या विकासासाठी १०० कोटी रूपयांचा विकास आराखडा मंजूर झाला होता. परंतु कोवीडच्या महामारी काळापासून याबाबतची कार्यवाही ठप्प झाली. त्यामुळे महाराष्ट्र भरातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री क्षेत्र कपीलधारचा विकास करण्यासाठी शासनाने निधीची तरतूद करावी. यासोबतच बीड मतदारसंघात एकूण ३५० शाळा आहेत, त्या शाळांमधील ५९२ शाळा खोलींची अतिशय दुरावस्था झाली आहे म्हणजे त्या अक्षरशः पडतीला आल्या आहेत. ६३ वस्तीशाळांच्या इमारतींसाठी निधीची गरज आहे. तसेच ग्रामीण भागातील अनेक रस्ते आणि पूल दुरूस्तीला आले आहेत त्यांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा ३ मधून मंजूरी देण्यात याव्यात. अनेक ग्रामपंचायत कार्यालयाच्या नवीन इमारतींची मागणी सातत्याने होत आहे. त्यासाठी निधी देण्यात यावा. या महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकून आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. विमानतळ होतय ही आनंदाची बाब पण.... बीडमध्ये विमानतळ होणार. या कामासाठी निधीची तरतूद करून याबाबतच्या कार्यवाहीला लवकरच सुरूवात करण्यात येईल अशी घोषणा याच आठवड्यात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार साहेबांनी याचा मनस्वी आनंद आहे. त्याबद्दल ना.अजितदादांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. परंतु बीड शहरात रहिवास करणार्या ३ लाख लोकांना पाण्यावाचून कधीपर्यंत वेठीस धरायचे! योजना आणि पाणी उपलब्ध असतानाही नागरिकांचे हाल कधीपर्यंत होऊ द्यायचे? ३६ कोटी रूपयांची तातडीने तरतूद करून बीड शहराचा मुलभूत प्रश्न देखील प्राधान्याने मार्गी लावला पाहिजे

# ज्येष्ठ नागरिक संघ नेरुळ संस्थेचा जागतिक महिला दिन उत्साहात साजरा.

नवी मुंबई ( सुभाष हांडे देशमुख )

नवी मुंबई : नेरुळ येथील ज्येष्ठ नागरिक संघ संस्थेचा जागतिक महिला दिन सोहळा गुरुवार दिनांक १३ मार्च २०२५ रोजी संस्थेच्या श्री गणेश सभागृहात मोठ्या उत्साहात साजरा झाला. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले राज्य सरकार पुरस्कार विजेत्या श्रीमती फुलन ज्योतिराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या डॉक्टर श्रीमती वृषाली मगदूम, साहित्यिक श्रीमती सुनंदा भोसेकर, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अरविंद वाळवेकर आदी मान्यवर विचार मंचावर उपस्थित होते. जेष्ठ नागरिकांनीही उत्स्फूर्तपणे उपस्थित राहून सहभाग दर्शविला. प्रसंगी विविध क्षेत्रात योगदान दिलेल्या

महिलांचा हिरकणी पुरस्कार - २०२५ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दीप प्रज्वलन आणि सावित्रीबाई फ ुले यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करुन सुरू झालेल्या या कार्यक्रमात श्रीमती अपर्णा दाबके ताई यांच्या सहका-यांनी स्वागत गीत व प्रार्थना म्हटली. त्याचप्रमाणे नंदलाल बॅनर्जी यांच्या शंखनादाने वातावरण अधिक मंगलमय झाले. आपल्या प्रास्तविक भाषणात अरविंद वाळेकर यांनी महिलांच्या चळवळीला ५० वर्ष झालेली आहेत असे नमूद करुन जेष्ठ नागरिक संघ करीत असलेल्या कार्याविषयी उपस्थितांना माहिती दिली.उपस्थितांशी संवाद साधताना श्रीमती वृषाली मगदूम यांनी गेल्या पन्नास वर्षात स्त्रियांच्या झालेल्या चळवळीचा आढावा घेतला. आज देखील स्त्रियांची प्रगती तितकीशी बदललेली नाही, आज देखील ग्रामीण भागातील कष्टकरी महिलांना समान वेतन मिळत नाही असे मत त्यांनी व्यक्त केले. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले तसेच फातिमा शेख या भारतीय पहिल्या महिला शिक्षकांचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख करुन भंवरी देवी, बिलकिस बानू तसेच निर्भया केस यांचा आपल्या भाषणात उल्लेख केला. त्यानंतर ज्येष्ठ नागरिक संघाने विविध क्षेत्रात योगदान दिलेला महिलांचा हिरकणी पुरस्कार - २०२५ देऊन त्यांनी सत्कार केला.हरकणी पुरस्कारप्राध्यापिका प्रतिभा सराफ, (साहित्य) , श्रीमती मनीषा वळकुंडे, (व्यसनमुक्ती ), श्रीमती रेहान पटेल राणे , (कलाक्षेत्र) ,श्रीमती कमल आंगणे (वैद्यकीय क्षेत्र) ,श्रीमती सुवर्णा मिसाळ , (शैक्षणिक क्षेत्र ),श्रीमती बाला सिताराम रोकडे, (क्रीडा क्षेत्र) ,श्रीमती बिना भरत साळेकर, (सामाजिक कार्य) , श्रीमती रुक्मिणी जोसेफ पॉल, (स्वच्छता दूत ) श्रीमती लता शिरसाट, (पोस्ट वूमन) यांना अनुक्रमे देण्यात आला. उत्कर्ष ज्येष्ठ महिला मंडळाच्या माध्यमातून श्रीमती रेखा वाळवेकर यांनी जे अनमोल सामाजिक कार्य केले या कार्याचा उचित गौरव त्यांना ङ्गजीवन गौरव ङ्ग पुरस्कार देऊन करण्यात आला. प्रसंगी रणजीत दीक्षित यांनाही वाढदिवसाच्या निमित्ताने पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व्याख्यान सपन्न

नेहरूनगर कुर्ला मुंबई : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती घणसोली शाखा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेवा समिती व महिला मंडळ नेहरूनगर कुर्ला वतीने दिनांक २० मार्च रोजी धम्मकुटीर विहार नेहरूनगर कुर्ला येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक सामाजिक कार्याची ओळख करून देणारे व्याख्यान आयोजित करण्यात आलें होते. सावित्रीबाई फुले यांच्या व्यक्तिमत्वात विविध पैलू होते त्या भारतीय पहिल्या महिला शिक्षिका, मुख्याध्यपिका, शिक्षणतज्ञ, साहित्यिक, थोर आधुनिक विचारवंत,नेत्या, संघटक, अंधश्रद्धेला विरोध करणा-या, वैज्ञानिक दृष्टीकोन जोपसणा-या होत्या.महात्मा ज्योतिबा

फुले यांच्या प्रत्येक कार्यात त्यांनी मोलाची साथ दिली असून त्यांचे कार्य पुढे सुरु ठेवले आहे.पुण्यात पडलेल्या दुष्काळात हजारो मुले त्यांनी जगवली आहेत तसेच प्लेगच्या साथीत आपला स्वतःचा जीव धोक्यात घालून लोकांचे प्राण वाचवली आहेत . असे अनेक माहित नसलेले पैलू प्रदीप कासुर्डे सर यांनी पीपीटी द्वारे सादर केले.उपस्थित महिला व पुरुष वर्गाने आम्हांला यातील बरीच माहिती ही या व्याख्यानामुळे समजली अशा प्रतिक्रिया दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निता केदारे मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याच कार्यक्रमात देहादान अवयवदान याबद्दल ही माहिती देण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रदीप कासुर्डे,तुषार शिंदे,अशोक निकम, राजेंद्र पंडित, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेवा समिती पदाधिकारी उपस्थित होते.

## बोरखेडच्या बिनविरोध सरपंच अपात्र

बीड-प्रतिनिधी १९८४ साली केलेल्या अतिक्रमणामुळे बोरखेडचे बिनविरोध सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांना जिल्हाधिकारी बीड यांनी अपात्र केले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की बोरखेड सरपंचा विरोधात माजी सरपंच शहादेव हिंदोळे यांनी ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १४ ज ३ व १६ अन्वये तक्रार दाखल केली होती. बोरखेडचे सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांनी गट नंबर १९७ मध्ये सन १९८४ साली अतिक्रमण केले असून तेव्हापासून सदरील जमीन वहीती करत आहे तसेच १९९२ ९३ मध्ये अतिक्रमण प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे देखील एडवोकेट के एस पंडित यांनी निदर्शनास आणून दिले.पंडित साहेबांना ॲड सुनिल वडमारे,ॲड.नागेश तांबारे, ॲड. अक्षय मुळे, ॲड.अभिजीत कदम यांनी सहकार्य केले. अतिक्रमण प्रकरणात बोरखेड सरपंच फुलाबाई रोहिदास पवार यांना अपात्र करण्याचे आदेश माजी जिल्हाधिकारी बीड यांनी दिले आहेत.

# प्रणाली प्रकाशन , चिंचवड . प्रकाशनाचे डॉ. पी. एस. आगरवाल लिखित फकीर गुरू ४८ वे पुस्तक प्रकाशित .

**संतांनी फकिरी वृत्तीने समाजप्रबोधन केले! - ह. भ. प. किसनमहाराज चौधरी**

डॉ. पी. एस. आगरवाल लिखित फकीर गुरूफ पुस्तकाचे प्रकाशन संपन्न पिंपरी स्वतः कफल्लक राहून संतांनी फकिरी वृत्तीने समाजप्रबोधन केले. ङ्गफकीर गुरूफ तोच कित्ता गिरवत आहे!फ असे विचार ह. भ. प. किसनमहाराज चौधरी यांनी पिंपळे गुरव येथे गुरुवार, दिनांक २० मार्च २०२५ रोजी व्यक्त केले. प्रणाली प्रकाशन आणि दिलासा साहित्य सेवा संघ आयोजित तसेच ज्येष्ठ साहित्यिक डॉ. पी. एस. आगरवाल लिखित ङ्गफकीर गुरूफया पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात किसनमहाराज चौधरी बोलत होते. वृक्षमित्र अरुण पवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते; तसेच साहित्यिक सुभाष चव्हाण, गुणवंत कामगार संदीप पोलकम, डॉ. पी. एस. आगरवाल, प्रकाशिका शामला पंडित ( दीक्षित ), दिलासाचे संस्थापक -अध्यक्ष सुरेश कंक यांची व्यासपीठावर आणि ज्येष्ठ कवयित्री राधाबाई वाघमारे, शोभाताई जोशी, अशोकमहाराज गोरे, कैलास भैरट, जयश्री श्रीखंडे, जयश्री गुमास्ते, नीलेश शेंबेकर, बाळकृष्ण अमृतकर, अण्णा जोगदंड, आनंद मुळूक, हेमंत जोशी, भाऊसाहेब गायकवाड, भरत शिंदे यांची सभागृहात प्रमुख उपस्थिती होती.ह. भ. प. किसनमहाराज चौधरी पुढे म्हणाले की,गुरू अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानाची प्रकाशवाट दाखवत असतो!सुभाष चव्हाण यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. सुरेश कंक यांनी ङ्गहवा के साथ साथःङ्घ आणि ङ्गसुन के तेरी पुकारः या गीतांच्या माध्यमातून पुस्तकावर मार्मिक भाष्य केले. याप्रसंगी डॉ. पी. एस. आगरवाल यांनी आपल्या मनोगतातून, ङ्गदेशात, जनतेत आणि शासनात बोलघेवड्यांचा सुकाळ आला असून कृतिशील व्यक्तींचा दुष्काळ आहे. त्यामुळेच समाजातील अनाचार, अनीती अनब भ्रष्टाचार यावर फकीर गुरूफ या काल्पनिक नायकाच्या माध्यमातून भाष्य केले आहे!अशा भावना व्यक्त केल्या. छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. तानाजी एकोंडे यांनी प्रास्ताविकातून ङ्गफकीर गुरूफ या पुस्तकाची निर्मितीप्रक्रिया उलगडून सांगितली; तर शामला पंडित ( दीक्षित ) यांनी समाजमाध्यमातील लेखन पुस्तकरूपात प्रकाशित करण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. यावेळी मुखपृष्ठावरील फकीर गुरूच्या प्रतिमेत असलेल्या संदीप पोलकम यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

शरद काणेकर, सूर्यप्रकाश आगरवाल, खुशबू आगरवाल यांनी संयोजनात परिश्रम घेतले. प्रदीप गांधलीकर यांनी सूत्रसंचालन केले. शामराव सरकाळे यांनी आभार मानले .

# डॉ.ओमप्रकाश शेटेंची आयुष्मानच्या अध्यक्षपदी निवड मुख्यमंत्र्यांची विश्वासू शिलेदारावर मोठी जबाबदारी

बीड दि.२१ (प्रतिनिधी) :- बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा गोरगरिबांचे देवदूत म्हणून परिचित असलेल्या डॉ. ओमप्रकाश शेटे यांना पदोन्नती मिळाली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीच्या अध्यक्षपदी निवड केली आहे. त्यांची निवड व कार्यकक्षा याबाबत सरकारच्या वतीने शासकीय परिपत्रक काढण्यात आले आहे. सरकारकडून झालेला हा सन्मान त्यांच्या कष्टाचे व परिश्रमाचे मूल्य अधोरेखित करणारा आहे. डॉ. शेटे यांच्याकडे आरोग्य क्षेत्रातील महत्वपूर्ण जबाबदारी आल्यामुळे सर्वसामान्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू म्हणून डॉ.ओमप्रकाश शेटे सबंध महाराष्ट्राला परिचित आहेत. फडणवीस यापूर्वी मुख्यमंत्री असताना डॉ. शेटे यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून केलेले काम उल्लेखनीयच नाही तर ऐतिहासिक आहे. तत्कालीन सरकारमध्ये फडणवीस यांचा मसातवा माळाफ गोरगरीब रुग्णांसाठी आरोग्य मंदिर बनला होता. त्या मंदिरातील पुजारी म्हणून शेटे यांनी केलेली रुग्ण सेवा अभूतपूर्व होती, याला महाराष्ट्र साक्षी आहे. त्यावेळी लाखो लोकांना योजनेचा लाभ देत मुख्यमंत्री सहायता निधीतून ६०० कोटी व धर्मादाय कोट्यातून एक हजार दोनशे कोटींचे उपचार करण्याचा विक्रम करण्यात आला होता. मात्र महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळामध्ये गरीब रुग्णांना उपचारासाठी मदत मिळणे दुरापास्त झाले होते.



राज्यामध्ये परत देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी आपल्या खास विश्वासू शिलेदारांना सोबत घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचे निकटवर्तीय असलेल्या डॉ. ओमप्रकाश शेटे यांनाही पदोन्नती देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने फडणवीस यांच्या मान्यतेने प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा फुले जनआरोग्य योजना एकत्रिकरण करुन पाच लाख रुपयांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत नेण्याची जबाबदारी डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्यावर सोपवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्वकांक्षी योजना म्हणून परिचित असलेल्या आयुष्मान भारत योजनेच्या महाराष्ट्राच्या अध्यक्षपदी डॉ. ओमप्रकाश शेटे यांची निवड करण्याचा महत्वपूर्ण निर्णय फडणवीसांनी घेतला आहे. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

### डॉ.ओमप्रकाश शेटे सक्षम पर्याय

विधान परिषदेच्या सभागृहात अधिवेशनामध्ये सत्ताधारी व विरोधक यांनी लक्षवेधी लावत आयुष्यमान भारत व महात्मा फुले जन आरोग्य योजना यातील त्रुटीवर प्रचंड टीका केली होती. या योजनेतील त्रुटीमुळे सामान्य माणसांना पाच लाख रुपयाचा लाभ मिळत नाही असा आरोप सर्वांनी केला होता. कदाचित या योजनेला शेवटच्या घटकापर्यंत देण्याकरिता व झारीतले शुक्राचार्य बाजूला करण्याकरिता डॉ.ओमप्रकाश शेटे सारखा अनुभवी व सक्षम पर्याय म्हणून फडणवीस यांनी त्यांच्यावर जबाबदारी सोपवली असल्याचे समजते.

### रुग्ण व रुग्णालये दोन्ही वाचली पाहिजेत..!

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अशी एकत्रित असलेल्या आयुष्मान योजनेमध्ये राज्यातील १८०० पेक्षा जास्त रुग्णालये अंगीकृत आहेत. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या हॉस्पिटलवर चाप बसण्याची गरज आहे. रुग्ण आणि रुग्णालये दोन्ही वाचली पाहिजेत यासाठी डॉ. ओमप्रकाश शेटे कसा सुवर्णमध्य साधतात? हे पहावे लागेल. जबाबदारी सोबतच मिळालेल्या अधिकारांचा वापर करून डॉ. शेटे हे सामान्य रुग्ण व रुग्णालये या दोघांमध्ये योग्य समन्वय साधतील यात शंका नाही. यासाठी यापूर्वीचा दांडगा अनुभव त्यांच्या कामी येईल.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com